
Vol. 9 | 1st December, 2019 (Monthly) | **Price**: ₹**100/-** | **Total Pages**: 36

चिकूPiku.com

Fun & Learning

1 to 8 Years



For Kids & Parents

Brain-based Nurturing for Early Childhood.
Stories & Activities in मराठी & English Languages.

Find these hidden objects on the front cover



चिकूपिकूचा वापर कसा करता येईल?



१ ते ३ वयोगटातील मुलांसाठी

- चित्रं दाखवून गोष्टी सांगूया, अगदी जेवण भरवतानासुद्धा.
- खडू, पेन्सिल देऊन Activitiesची पानं समोर ठेवूयात. रेघोट्या ओढल्या, पान फाटलं तरी हरकत नाही.
- गोष्टीतील चित्रं समोर ठेवून Audio Stories ऐकवूया.

३ ते ६ वयोगटातील मुलांसाठी

- आई-बाबांबरोबर अंकातील गोष्टी वाचल्या की पुढच्या वेळी मुलं चित्रांमधून गोष्टी समजून घेतील. पुन्हा-पुन्हा अंक हाताळतील. चित्रं बघतील.
- नुसती चित्रं बघून मुलंसुद्धा गोष्ट सांगू शकतील.
- Activities स्वतः सोडवू शकतील.





६ ते ८ वयोगटातील मुलांसाठी

- चित्ररूपी लहान-लहान गोष्टी वाचायला मुलांना आवडतील.
- लहान भाऊ-बहिणीला गोष्ट सांगू शकतील.
- नव्या Activities स्वतः बनवू शकतील.
- चित्रं वापरून नव्या गोष्टी रचू शकतील.

ChikuPiku team of experts: **Dr. Shruti Panse** (Educationist) | **Abha Bhagwat** (Artist- Wall art painting)
Dharmaraj Patil (Ornithologist) | **Vaidehi Ashtaputre-Kulkarni** (Storyteller)
Prajaktta Kapure (Author) | **Vaishali Karlekar** (Author) | (An enthusiastic team of illustrators & artists)

Owned & Published by OneZeroEight Learning Pvt. Ltd. | **Editor**: Dr. Shruti Panse
Printed by Atharva Print Creation, S. No. 91/1, Plot No. 8, Tulshibaugwale Colony, Sahakar Nagar, Pune 411 009
Published at Flat No. 10, Narayan Complex, 2nd Floor, Hingne Kh., Sinhgad Road, Pune 411 051

प्रिय आई-बाबा,

दिवाळीनिमित्त प्रकाशित केलेल्या अंकाला आपण सर्वांनी अतिशय भरघोस प्रतिसाद दिलात, याबद्दल आपल्या सर्वांचे आमच्या सर्व टीमकडून खूप-खूप आभार! मुलं अंकातल्या गोष्टी कशा ऐकतात, कसे प्रश्न विचारतात, गोष्टी ऐकून कसा प्रतिसाद देतात, काय बोलतात – हे ऐकायला खूपच छान वाटतं.

लहान मुलांना गोष्ट सांगणं किंवा वाचून दाखवणं ही एक आनंदाची प्रक्रिया असते. आपले शब्द त्यांच्या कानावर पडतात आणि मुलं त्या विश्वात पूर्ण समरस होतात. गोष्टी सोबत चित्रं असली तर त्यांना ती बघायला आवडतात. चित्रांकडे खूप बारकाईनं लक्ष असतं. गोष्टीनुसार चित्रं पुढे सरकत गेली तर त्यांना ते योग्य वाटतं. अनेक मुलांना गोष्टीतल्या प्रत्येक वाक्याचं चित्र हवं असतं. किंवा एखाद्या चित्रात गोष्टीतलं पात्र दिसत नसेल, तर ते कुठे आहे असं विचारतात. ते शब्द आणि चित्रं यासोबत स्वतःचं कल्पनाविश्व निर्माण करून त्यात रमतात. मनातल्या अमूर्त संकल्पना विकसित होण्यासाठी, अमूर्त संकल्पनांना मूर्त रूप येण्यासाठी गोष्टी खूपच मदत करतात.

गोष्ट ऐकताना त्यांचं पूर्ण लक्ष असेल तर ती संपल्यावरही त्यांच्या मनात चालू राहू शकते. गोष्टीतल्या पात्रांशी स्वतःशी जोडून घ्यायला त्यांना आवडतं. म्हणून गोष्टीतले आई-बाबा, मित्र-मैत्रिणी, शाळा, बाग या सर्वांशी ते मनातल्या मनात जोडून घेत असतात.



या संदर्भातले तुम्हाला आलेले अनुभव आम्हाला पाठवलेत तर नक्कीच आवडतील.

डॉ. श्रुती पानसे
Editor - ChikuPiku
Ph.D. (Brain-Based Learning)
Educationist | Consultant
www.shrutipanse.com

फिशिरा

डॉ. श्रुती पानसे

थंडीमुळे समुद्राचं पाणी थंडगार झालं होतं. सगळ्यांनाच आता थंडी वाजायला सुरुवात झाली होती.




ऑक्टी म्हणतो, **''खुफिया सागर भागात तो 'ढब्बू मासा' राहतो. तिथे जायला आईनं नाही सांगितलंय.''**

फिशिरा म्हणते, **''इतकं काय घाबरतोस रे? लगेच जाऊन येऊ. चल पटकन.''**

ऑक्टी घाबरत-घाबरत हो म्हणतो. फिशिरा आणि ऑक्टी दोघेही खुफिया सागर भागात जायला निघतात.

खुफिया सागर भागात
पोहोचल्यावर उबदार
पाण्यामुळे त्यांना बरं वाटतं.
पण तेवढ्यात त्यांना
कसला तरी आवाज येतो.
दोघं मागे वळून बघतात
तर ढब्बू मासा येत असतो.

दोघंही पोहत एका कपारीमागे लपतात.
आता त्यांना पळायला वाटच नसते.






Parents Zone

काही ऑक्टोपस स्वतःच्या रक्षणासाठी काळा रंग सोडतात. मुलांना तसं सांगता येईल.

Audio story available on www.chikupiku.com/audio

ढब्बू मासा फिशिरा आणि ऑक्टीजवळ यायला लागतो. तितक्यात अचानक पाण्यात काळ्या रंगाची शाई पसरते. तो काळा रंग ढब्बू माशाच्या डोळ्यात जातो.



ऑक्टी फिशिराचा हात पकडून त्याला ओढतो. आणि दोघं सुसाट पोहत त्यांच्या घराजवळ पोहोचतात.

मित्रांनो, तुम्हाला समजलं का काळी शाई कुठून आली ते?

तिचं जग

फारुक एस. काझी

घरातले सगळे तिच्या बेडजवळ उभे होते. थोड्याच वेळात डॉक्टर तिच्या डोळ्यांवरची पट्टी काढणार होते.



Parents Zone

डोळे नसतील तर काय होईल? काही लोकांना डोळे नसतात. ते कसे जगत असतील? गोष्ट सांगून या विषयावर मुलांशी बोलता येईल. मुलांनी समाजातील इतर लोकांबद्दल संवेदनशील असणं महत्त्वाचं आहे.

आई तिला म्हणते, **''डोळे उघड बबडे. बघ तरी एकदा.''** आईच्या बोलण्याने ती डोळे उघडायला तयार होते. गोल-गोल मोठाले तपकिरी डोळे उघडून तिने पाहिलं. आणि विचारलं...





''तू कोण?''
''मी तुझी आई.''

''तू कोण?''
''मी तुझा बाबा''





''तू कोण?''
''मी तुझा दादा!''

''तुम्ही कोण?''
''आम्ही तुझे आजी-आजोबा.''





आईने तिला मिठीत घेतलं.

तिला घेऊन आई
खिडकीजवळ गेली.

बाहेरची झाडं, वेली, फुलं,
पाखरं, आकाश पाहून तिने
विचारलं...

''हे कोण?''




आई म्हणते, **''हे तुझं
जग. जे फक्त आणि
फक्त तुझं आहे.''**

ती आईच्या गळ्यात
पडली. घट्ट बिलगली.



Colour the picture by numbers



1. Yellow   2. Dark Green   3. Light Green   4. Blue   5. Purple


Parents Zone मुलांनी इतर आवडीचे रंग वापरले तरी चालतील. मनमोकळेपणाने रंगवू द्या. सक्ती नको.


चिमणी चित्र


-आभा भागवत


Visual / Spatial Intelligence

आज आपण गोलाच्या गमती करणार आहोत. चित्रांमध्ये गोल कुठे आत तर कुठे बाहेर, कुठे एकमेकांत अडकलेले गोल तर कुठे सुट्टे पण चिकटून गच्च बसलेले गोल आहेत. असे गोल काढून बघ आणि चित्र तयार कर.


एकमेकांत अडकलेले गोल



आकारात दाटीवाटीने माववलेले गोल



बाहेर गोल


अडकलेले खूप गोल


एका बाजूला चिकटलेले गोल


गोलात गोल


आकाराबाहेर गोल


आत गोल

पालकांसाठी


आवर्जून काय कराल?


कितीही वेडा-वाकडा गोल आला तरी मुलांचं कौतुक करा. गोलांच्या अनेक रचना करता येणं महत्त्वाचं. गोलांची चित्रं काढून झाली की चौकोन, त्रिकोण, लंबगोल, आयत आणि इतर कुठलेही आकार काढत हा खेळ चालू ठेवता येईल.

काय करू नका?

मुलांचा चित्रांमधला रस संपल्याशिवाय तुम्हाला सुचलेल्या रचना त्यांना दाखवू नका. मुलांची कल्पकता अनुभवण्याची संधी हिरावून घेऊ नका.

गोलांपासून तयार केलेली चित्रं.





तू पण इथे गोलांपासून चित्र काढून बघ.

हे चित्र काढून आम्हाला Whatsapp वर पाठवा.
91721 36478



असं का होत असेल?

पानांचा रंग आधी हिरवा आणि नंतर पिवळा का होतो?




रंगव

Parents Zone

वर दिलेला प्रश्न मुलांना विचारा.
त्यांच्या उत्तराला हसू नका.

पानांमध्ये क्लोरोफिल नावाचं एक द्रव्य असतं. त्याच्यामुळे पानांना हिरवा रंग मिळालेला असतो. जसजसं पान सुकतं, तसतसं क्लोरोफिल कमी होतं आणि आधीपासून असलेला, पण आपल्याला दिसत नसलेला पिवळसर रंग दिसायला लागतो.

Draw a ☺ in the box if objects are companions. Draw a ☹ in the box if objects are opposites.

  ☐ |   ☐

  ☐ |   ☐

Curious CUBO

Prajaktta Kapure

Cubo and friends are going to school on a cold winter morning. The school is 10 minutes walking distance. Seema Aaji is accompanying children.

Good morning children.
How are you all doing??



Aaji, we are freezing.
It's so cold. I can't even
move my fingers.



It's so hard
to get out of
the bed in
this cold.




Audio story available on
www.chikupiku.com/audio


My Mom makes me wear this monkey-cap but when I take it off my hair stands up.
Don't you think winters are the best time of the year? Now, there is no more sweat. It will be fun to sit around a bonfire.
Yesss! And we will get to hear stories from you, Aaji.
Aaaji, look! While we are talking, cloud-like air is coming out of our mouths
That is called as condensation Cubo.
What does that mean?





In winter, the outside temperature is lower than our body temperature. Our breath contains gases and moisture. When the hot breath comes out from our mouth and meet outside cold air. It loses its original form and turns into tinny water droplets, which looks like clouds.



All laughs. Friends, can you make such clouds?

Nature and मी

Dharmaraj Patil
(Ornithologist / Wildlife Researcher)

थंडीतले पाहुणे

थंडी वाढली की काही पक्षी परदेशातून तर काही खूप दूरुन भारतात पाहुणे म्हणून येतात. तिकडची थंडी त्यांना सहन होत नाही. शिवाय थंडीमुळे तिथे त्यांना खाऊ शोधणंही अवघड होतं.

आम्ही हिमालयातील लडाखमधून येतो.
पाण्याजवळ तुला मी नक्की दिसेन.



पांढरा धोबी
(White Wagtail)



आम्ही चीनमधून भारतात येतो.
इतका लांबचा प्रवास करुन आम्ही नेमक्या ठिकाणी येतो. म्हणजे अगदी ठरलेल्या झाडावरसुद्धा.

करडा कोतवाल (Ashy Drongo)

आम्ही भारतातल्या भारतातच प्रवास करतो.
माझा नाव वेडा राघू. असं नाव का बरं पडलं असेल? पहा कुठे माहिती सापडते का.
चिकूपिकूच्या पुढील अंकात मी हे उत्तर देईन.



वेडा राघू
(Green Bee Eater)

आम्ही हजारो पक्षी एकत्र उडत युरोपमधून भारतात येतो. आम्ही एकत्र उडताना थव्यांचे मस्त वेगवेगळे आकार तयार करतो.



भोरड्या (Rosy Starling)



निलांग
(Verditer Flycatcher)

मीसुद्धा युरोपियन पाहुणा आहे. आम्ही शहरातील गर्द झाडीच्या आसपास दिसून येतो.

आम्ही छोटेसे, अंगठ्याएवढे दिसतो पण हजारो किलोमीटरचा प्रवास करून भारतात येतो. थंडीच्या दिवसात चक-चक असा झुडपातून जो आवाज येतो तो आमचाच असतो. ब्लीथ हे ब्रिटिश पक्षीशास्त्रज्ञाचं नाव आहे ज्यांनी पक्षीशास्त्राला माझी ओळख करून दिली.



ब्लीथचा वटवट्या
(Blyth's Reed Warbler)

पहा हे पक्षी आपल्या घराजवळ कुठे दिसून येतात का? पण त्यासाठी भल्या पहाटे उठून शोध घ्यावा लागेल. यातील एकही पक्षी दिसला तर आम्हाला जरूर कळवा.

टीप: दिलेल्या चित्रांत आणि पक्ष्यांच्या प्रत्यक्ष आकारात फरक आहे.



वैदेही अष्टपुत्रे-कुलकर्णी

छबी पांढऱ्या अस्वलाची बर्फातली गोष्ट पुस्तकात वाचत होती. तिला त्यातलं बर्फाच्या डोंगराचं चित्र इतकं आवडलं की तिला वाटायला लागलं, आपणपण बर्फात गेलो तर???

छबी पुस्तक घेऊन पळत बागुलबुवाकडे गेली आणि म्हणाली, **''बागुलबुवा ही अशी पुस्तकातल्या बर्फातली मजा बघायला घेऊन चल ना रे मला!''**

बागुलबुवा म्हणाला, **''धीर धर-धीर धर, छबू जरा धीर धर. ''चिंग चिंग चू चिंग चिंग चू बबलू अस्वला लवकर ये बघू.''**





आणि काय गंमत, एक मस्त मोठ्ठ गुबगुबीत पांढरं अस्वल तिकडे येतं. त्या अस्वलाच्या पाठीमागे एक छानशी टांग्यासारखी गाडी होती. पण या गाडीला चाकं नव्हती. या गाडीला होते स्केट्स बोर्ड! बागुलबुवा म्हणाला, **''चिंग चिंग चू चिंग चिंग चू बबलू अस्वला बर्फात चल तू''.**

बघता–बघता छबी आणि बागुलबुवा बर्फात येऊन पोहोचले. छबीला बर्फ बघून फार आनंद झाला. छबी म्हणाली, **''बापरे!! इकडे तर सगळं किती पांढरंशुभ्रं दिसतय''.** छबी उडी मारून गाडीच्या बाहेर आली आणि म्हणाली, **''अरे बापरे बर्फात चालताच येत नाहीये मला. उडी मारून बघते! अरे.. अरे.. अरे.. पडले!''**





बागुलबुवा हसत म्हणाला, **''हाहाहाऽऽ आता मी बघ बर्फातला पक्षी कसा करतो''.** बागुलबुवाने बर्फावर झोपून दोन्ही हात–पाय पसरून वर–खाली हलवले. आणि पक्ष्याचा आकार तय्यार!!

बर्फात लोळतानाच बर्फाचा पाऊस सुरु झाला. छबीने त्या बर्फाचे चेंडू तयार करून बागुलबुवाच्या अंगावर फेकले.

तेवढ्यात तिथे बबलू अस्वलाचा मित्र रिंकू रेनडिअर आला. बागुलबुवा म्हणाला, **''रिंकू आपल्याला बर्फात स्केटिंग करायला शिकवणार आहे.''** बागुलबुवा, छबी, रिंकू आणि बबलू बर्फात स्केटिंग करत एका घरापाशी पोहोचले.



छबी आश्चर्याने डोळे मोठे करून म्हणाली, **''बापरे हे असं-कसं घर?, मी आत जाऊन बघते.''** छबी दारातून रांगत त्या घरात जाते. बागुलबुवा म्हणाला, **''छबी या घराला इग्लू म्हणतात बरं का!''** छबीला बर्फाचं घर खूप आवडलं. आता घरी जायची वेळ झाली होती.

सगळ्यांना टाटा करून बबलू अस्वलाच्या गाडीतून छबी आणि बागुलबुवा पुन्हा घरी जायला निघाले. छबीनं गाणं म्हणलं,


बागुलबुवा मला बर्फात घेऊन गेला
बर्फात मी गेले, स्केटिंग मी केले
इग्लुपाशी जाऊन पोहोचले झप-झप-झप
बर्फाचा पाऊस जोरात सुरु झाला
बर्फ मी झेलला, त्याचा चेंडू मी केला
जोरात फेकला सप-सप-सप
बर्फातली मजा असते फारच न्यारी
माझीतर जमली बर्फाशी दोस्ती!

बबलूचा निरोप घेऊन बागुलबुवा आणि छबी घरी पोहोचतात.



बर्फाची गोष्ट असलेलं पुस्तक जवळ घेऊन मऊ-मऊ पांघरुणात शिरून छबी गाढ झोपून जाते.

चित्रं - ओंकार मरकळे





सांग ना गं आई

– विद्याधर शुक्ल



आई जरा थांबना,
इथे जरा बैसना
दादा गेला शाळेमध्ये,
माझ्या बरोबर बोलना



मुंगी कुठे राहते?
कुठे चालली गाय?
आपल्या मनीमाऊच्या
बाळाचं नाव काय?





पाण्यातला मासा
झोपतो तरी कुठे?
सकाळी चांदोमामा
लपतो गं कुठे?





मोराला नाचायला
शिकवलं कोणी?
भांड्याशिवाय चिऊताई
पिते कशी पाणी?



टीव्हीमध्ये माणसे
जातात तरी कशी?
बाबांसारखी तुला का नाही
काळी-काळी मिशी?





ऑफिसमध्ये तुझ्या
मला सांग कधी नेणार?
तुझ्यासारखी आई मी
मोठ्ठी कधी होणार?

आई बाबांसाठी

कवितेतले प्रश्न ओळखीची आहे ना? कवितेतल्या काही प्रश्नांची मुलांनी दिलेली गमतीदार उत्तरं आम्हाला पाठवा **(9172136478).** निवडक उत्तरं आम्ही चिकूपिकूच्या अंकात छापू.

चिकू Piku

वैशाली कार्लेकर

चिकू आणि पिकू गप्पा मारत असतात. अचानक त्यांना **‘चिव चिव’** करत रडण्याचा आवाज येतो. चिकू आणि पिकू इकडे-तिकडे शोधतात तर त्यांना एक चिमणीचे छोटे पिल्लू काटक्यांच्या ढिगाऱ्यात पडलेले दिसते. मग चिकू आणि पिकू त्या पिल्लाला मोकळं करायला जातात.



Audio story available on www.chikupiku.com/audio



तेवढ्यात एक रंगबिरंगी फुलपाखरु तिथे येतं. फुलपाखरू पिल्लाच्या भोवती गोल-गोल फिरतं, पिल्लाला मज्जा वाटते.



मग थोड्या वेळानं एक खारूताई येते.



मग खारुताई पिल्लाला गोष्ट सांगायला लागते. पिल्लू खारूताईची गोष्ट ऐकत बसतं. थोड्यावेळाने तिथेच झोपून जातं.



संध्याकाळ होते. पिल्लाची आई येते. चिऊचा आवाज ऐकून चिकू, पिकूचं लक्ष जातं.



पिल्लू उठतं, चिऊच्या कुशीत जातं.

पिल्लूचं उत्तर ऐकून सगळेच हसतात.

सगळ्यात छोटया फळाला गोल कर.
मोठ्या फळाखाली रेष ओढ.



खारुताईला सगळ्यात मोठ्या
फळापर्यंत पोहोचव बरं.

हातांची जादू


पेपरचे हेलिकॉप्टर

डॉ. विदुला म्हैसकर

1



2



3



4



5



साहित्य- कात्री, पेन, रंगीत कागद.

(१) १५ सेमी लांबीच्या आणि २.५ सेमी रुंदीच्या दोन कागदाच्या पट्ट्या घे. लांबी-रुंदीचं माप थोडं वेगळं असलं तरीही चालेल.

(२) एक पट्टी मधून ५ सेमी पर्यंत काप. दुसरी मात्र ३ सेमीच काप.


(३) ह्या कापापासून साधारण १ सेमी सोडून बाजूने दोन खाचा काप.

(४) आता नंतर केलेल्या खाचा वापरून चित्रात दाखवल्याप्रमाणे लांबीतून दोन वेळेला दुमड.

(५) आता पाती Y (वाय) आकारात दुमडलीस की हेलिकॉप्टर तयार!

(६) एक हेलिकॉप्टर लांब पात्याचं होईल आणि दुसरं छोट्या पात्याचं. दोन्ही उंचावरून सोड. ती मस्त भिरभिरत खाली येतात! लांब पात्यांचं थोडं हळू खाली येत ना? आता आकारात दुमडलेली पाती उलट वळव, म्हणजे हेलिकॉप्टर्सची गोल फिरण्याची दिशा उलट होईल! वरुन सोडलेलं हेलिकॉप्टर त्याच हाताने अलगद पकडायचा प्रयत्न कर.

1



उडणारा मासा

साहित्य- कात्री, पेन, रंगीत कागद.

2




एक १० सेमी x १ सेमीची कागदाची पट्टी घे. टोकांकडून १ सेमी वर दाखवल्याप्रमाणे दोन खाचा कर.

3



कागद वळवून दोन्ही खाचा एकमेकांमध्ये अडकव.

4



माश्याची तोंडाकडची बाजू थोडी दाबून चपटी कर.


5




आता तोंडाकडून मासा धरून उंच फेक. किती छान भिरभिरत खाली येतो ना?



निलू बाजारात गेली होती. तिच्या मागे मनीमाऊ लागली. मग काय गंमत झाली असेल? चित्र बघून सांग.





Parents Zone

एक-एक चित्रं मुलांना दाखवा. चित्रात काय घडतंय ते विचारा. चित्र बघून गोष्ट तयार करा. जिथे गरज असेल तिथे मदत करा. मुलांनी सांगितलेली गोष्ट आम्हाला पाठवा **(9172136478).**





मी एक मांजर,
फिरत राहते घरभर
पायामध्ये घोटाळते,
लाडे-लाडे घे म्हणते
आवडते मला दूध आणि भात
सारखं विचारते येऊ का आत ?


- रंगबावरी



अंगूठा छाप


1st December, 2019 (Monthly) | Price: ₹100/-
RNI TC No. MAHBIL10083

बोटांच्या ठशांपासून मुलांनी
छान-छान चित्रं काढून
आम्हाला पाठवली.
अंगूठा छाप स्पर्धेतील
विजेत्यांचे अभिनंदन.



Vihan Salaskar










Anvi Diwate



Advita Palve





तू पण तुझ्या बोटांच्या ठशांपासून
चित्रं काढून आम्हाला पाठव.